प्रेसनोट दि.०२/०५/२०२४

**विधी संघर्षग्रस्त बालकाकडुन घरफोडी चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आणुन, एकुण २,९८,४००/- रू किंमतीची मालमत्ता जप्त.**

**सोलापूर शहर गुन्हे शाखेची कामगिरी.**

---

सोलापूर शहरात जोडभावी पेठ पोलीस स्टेशन हद्दीत कुमारस्वामी नगर, शेळगी येथे दि.३०/०४/२०२४ रोजी रात्रीचे वेळी, दोन घरे फोडुन चोरी झाली होती. त्याबाबत जोडभावी पेठ पोलीस स्टेशन येथे, गु.र.नं.- २४७/२०२४, भादंविसं कलम ४५७, ३८० व गु.र.नं.- २४८/२०२४, भादंविसं कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे ०२ गुन्हे दाखल करणेत आले होते.

त्याअनुषंगाने, गुन्हे शाखेकडील, सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे पथकामधील अंमलदार यांनी नमुद गुन्हयाचे घटनास्थळी तात्काळ भेट दिली. नमुद घरफोडी प्रमाणे गुन्हे करणाऱ्या आरोपींच्या गुन्हे कार्यप्रणालीचा अभ्यास केला. त्याअनुषंगाने, बातमीदार यांना माहीती देऊन, घरफोडीचे आरोपीचा शोध घेत असताना, दि.०१/०५/२०२४ रोजी सपोनि/संजय क्षिरसागर यांना, गोपनिय बातमीदार यांचे मार्फत माहीती मिळाली की, एक मुलगा हा चोरीचे दागीने व मोबाईल घेऊन विक्रीसाठी थोडया वेळाने विडी घरकुल येथील भारत नगर येथे येणार आहे.

त्याप्रमाणे, प्राप्त बातमीचे अनुषंगाने, सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे पथकामधील अंमलदार यांनी, बातमीतील ठिकाणी जाऊन, सापळा लावुन विधी संघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले. त्यावेळी त्याने कुमारस्वामी नगर, शेळगी, सोलापूर येथे दि.३०/०४/२०२४ रोजी रात्रीचे वेळी दोन ठिकाणी घरफोडी केले असल्याचे कबुल केले. त्यानंतर, विधीसंघर्ष बालकाचे आईचे उपस्थितीत त्याची अंगझडती घेतली असता, विधी संघर्षग्रस्त बालकाचे पॅन्टचे खिशात **५३.०५ ग्रॅम सोने, १५०.२० ग्रॅम चांदी, ०१ मोबाईल असा एकुण २,९८,४००/- रू** किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्ती पंचनाम्यान्वये जप्त केला आहे. अशा प्रकारे, जोडभावी पेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२४७/२०२४, भादंविसं कलम ४५७, ३८० व गु.र.नं.२४८/२०२४ भादंविसं कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दाखल असलेले ०२ गुन्हे हे दाखल झाले पासुन **दोन तासाचे आत** उघडकीस आणुन गुन्हयात चोरीस गेलेला **१०० टक्के मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा), मा.प्रांजली सोनवणे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, मा.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, सहा.पोलीस निरीक्षक/संजय क्षिरसागर, अनिल जाधव, महेश शिंदे, राजु मुदगल, कुमार शेळके, अजय गुंड, सिध्दाराम देशमुख, सुमित्रा बारबोले, अर्चना स्वामी यांनी केली आहे.

Prayati

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
करीता,